# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

## दूरशिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सूचना

## (शैक्षणिक वर्ष २०१९–२०)

Estd : 1962
NAAC 'A' Grade

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रांतर्गत सातारा व सांगली या दोन विभागीय केंद्रांसह ७७ अभ्यासकेंद्रांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त बी.ए., बी.कॉम., एम.ए. (भाषा), एम.ए. (सामाजिक शास्त्रे), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), पी. जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन या अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०१९–२० च्या प्रवेशासाठी **दि. १७/०६/२०१९** पासून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेत येत आहेत. सदर अभ्यासक्रमांबाबतचे शुल्क व अधिकची माहिती www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education या लिंकवर उपलब्ध आहे.

**विद्यार्थी/प्रवेशार्थीसाठी सर्वसाधारण सूचना :**

१. **इच्छुक विद्यार्थ्यांकरिता प्रवेश नि परीक्षा अर्ज online.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Student Portal या लिंकवर दि. १७/०६/२०१९ पासून उपलब्ध आहेत.**

२. नूतन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरणेपूर्वी स्वत:चा युजर आयडी व पासवर्ड (User ID and Passward) तयार करुन रजिष्ट्रेशन (Registration) करणे गरजेचे आहे.

३. सर्व अभ्यासक्रम (पी.जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन वगळता) हे सत्र पध्दतीने असल्याने एका शैक्षणिक वर्षात असलेल्या दोनही सत्रांचे विषय व परीक्षा शुल्क एकाच वेळेस भरून घेतले जाते.

४. ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जाची एक प्रत विद्यार्थ्याने स्वाक्षरी करून त्यासोबत यापूर्वीच्या सर्व परीक्षांच्या गुणपत्रकांच्या (१२ वी व त्यानंतरच्या) स्वसाक्षांकित प्रती जोडून संबंधित अभ्यासकेंद्रांवर विहीत शुल्कासह जमा करावयाची आहे.

५. प्रवेश शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरता येईल.

६. प्रथम वर्ष पदवी/पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी त्यांचे मूळ Transfer Certificate / Leaving Certificate / Migration Certificate **अर्जासोबत किंवा एक महिन्याचे आत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश ग्राह्य धरले जाणार नाहीत.**

७. संपूर्ण भरलेला अर्ज अभ्यासकेंद्रावर जमा करण्याची अंतिम तारीख

**अभ्यासक्रम नियमित शुल्क (विहीत मुदतीत) : दि. २५/०७/२०१९ पर्यंत**

**अभ्यासक्रम नियमित शुल्क + विलंब शुल्क (रु. ५०/–) : दि. १०/०८/२०१९ पर्यंत**

**अभ्यासक्रम नियमित शुल्क + अतिविलंब शुल्क (रु. ३००/– + रु. ५०/–) : दि. २५/०८/२०१९ पर्यंत**

८. प्रथम वर्ष नव्याने ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक/मतदान ओळखपत्र सोबत ठेवणे गरजेचे आहे.

९. विद्यार्थ्याने निवडलेले अभ्यासकेंद्र हेच शक्यतो परीक्षा केंद्र म्हणून दिले जाते. तथापि परीक्षा केंद्र देण्याचा संपूर्ण अधिकार विद्यापीठाकडे राहील.

१०. अधिक माहितीकरिता संपर्क दूरध्वनी : ०२३१–२६९३७७१,२६९३८७१,२६०९४५१,२६०९४५२

**श्री महेश काकडे**
संचालक
परीक्षा आणि मूल्यमापन मंडळ

**प्रा. (डॉ.) व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव

जा.क्र. दूरशिक्षण/३०३/२०१९–२०
दिनांक :१७/०६/२०१९